# एकपात्री नाटकातून सायबर सुरक्षेचे धडे

## ☐ आयुक्तालयात बोधचिन्हाचे उद्घाटन



। पुणे : प्रतिनिधी

सायबर सुरक्षा विषयावर २०१४ पासून क्विक हील फाउंडेशनने जवळजवळ ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले आहे. या एक अंकी नाट्य महोत्सवातून लोकांना डिजिटल जगतातील धोके आणि समस्या समजतील, असे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी सांगितले.

सायबर सुरक्षेबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी क्विक हील फाउंडेशन आणि पुणे शहर पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने 'साय-फाय करंडक २०१७' या एकपात्री नाट्य स्पर्धेच्या बोधचिन्हाचे उद्घाटन क्विक हील टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, आर्थिक आणि सायबर गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त मिलिंद पाटील आणि एक्स्प्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके उपस्थित होत्या.

पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा, नागपूर या शहरातील ६ केंद्रांच्या माध्यमातून सप्टेंबर महिन्यात अर्ज स्वीकृतीस सुरुवात झाली आहे. त्यामध्ये शंभरहून अधिक संघांनी सहभाग घेतला आहे. भरत नाट्य मंदिर येथे दि. २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या अंतिम फेरीसाठी २८ संघांची निवड केली आहे.

मिलिंद पाटील म्हणाले, डिजिटलायझेशनच्या वाढीमुळे सायबर गुन्ह्यांचे धोकेही दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. पुणे शहरात २०१७ मध्ये ४ हजारांहून अधिक सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सायबर गुन्ह्यांबाबत योग्य माहिती देऊन त्याविषयी नेटीझन्सना जागरुक करण्याची गरज आहे.